थोडक्यात

शहरात गळफास घेऊन दोघांच्या आत्महत्या

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । शहर परिसरात नांदूर नाका व फुलेनगर येथे दोन जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आत्महत्येचा पहिला प्रकार नांदूर नाका येथे घडला. श्याम परसराम देवरे (वय ४८, रा. निसर्गनगर, नांदूर नाका, आडगाव) यांनी काल (दि. १०) सकाळी सहा वाजेच्या सुमारास राहत्या घराबाहेर लोखंडी जिन्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याने ते बेशुद्ध झाले. ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी देवरे यांना औषधोपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचा दुसरा प्रकार फुलेनगर येथे घडला. प्रकाश सुरेश तुंबळे (वय २१, रा. पाण्याच्या टाकीजवळ, फुलेनगर, पंचवटी) याने काल (दि. १०) रात्रीच्या सुमारास घराच्या छताला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. त्याला त्याची बहीण उमा हेमंत मानभाव यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

वडाळा नाका परिसरातून तडीपारास अटक

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । हद्दपारीच्या आदेशाचा भंग करून शहरात फिरणाऱ्या तडीपारास पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस अंमलदार गुरू गांगुर्डे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले, की आरोपी रेहान ख्वाजा कुरेशी (वय २३, रा. कुरेशी वाडा, वडाळा नाका, नाशिक) याला तीन महिन्यांकरिता शहरातून हद्दपार करण्यात आले आहे. कुरेशी हा काल (दि. १०) दुपारी १२ वाजेच्या सुमारास हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करून शहरात फिरताना मिळून आला. या प्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन त्याला अटक करण्यात आली आहे.

आनंदवल्ली परिसरातील उद्याने बनली मद्यपीचा अड्डा

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । मनपाची उद्याने तसेच मोकळे मैदान मद्यपींचा अड्डा बनला आहे. उद्यानामध्ये येणाऱ्या नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत असून या मद्यपींचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेंद्र शिंदे केली आहे सध्या उन्हाळा असल्याने जेष्ठ नागरिक, महिला, बाळ गोपाळ उद्यानामध्ये येतात मात्र ही उद्याने सध्या मद्यपींचा अड्डा बनत चालली आहे. सिरीन मेडोस, पाईपलाईनरोड परिसरातील बलवंतनगर येथील सार्वजनिक उद्यान व खुल्या जागा व मोकळी मैदाने मद्यपींचे अड्डे बनले आहेत. उद्यानात सकाळ, सायंकाळी खुलेआम दारूच्या पार्ट्यांसह नशापान केले जात आहे. आरडाओरड करत दारूच्या रिकाम्या बाटल्या उद्यानात भिरकावल्या जातात. त्यामुळे उद्यानात येणारी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत आहे. टवाळखोर नशाबाजावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांसह ॲड. महेंद्र शिंदे यांनी केली आहे.

पॉलिसीधारक जिवंत असल्याचे भासवून विमा कंपनीची १९ लाखांची फसवणूक

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । पॉलिसीधारक मयत असून, तो जिवंत असल्याचे भासवून एका ठगाने विमा कंपनीची १९ लाखांची फसवणूक केल्याची फिर्याद गंगापूर पोलीस ठाण्यात दाखल आहे. याबाबत फसवणूक झालेल्या रिलायन्स निप्पॉन कंपनीचे अधिकारी वासुदेव टिकम यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की त्यांच्या विमा कंपनीत विक्रमसिंग (रा. ११६, आदमपूर, राधा-राणी सिना रोड, बागलपूर) यांनी पॉलिसी काढली होती. सन २०२१ पर्यंत त्यांनी पॉलिसीचे नियमित हप्तेदेखील भरले होते. दरम्यान, त्यांचा मृत्यू झाला. ही बाब विमा कंपनीला माहीत नव्हती. एका ठगाने ही संधी साधत विक्रमसिंग हे मयत झालेले असताना त्यांची खोटी कागदपत्रे तयार करून एका बँकेत खाते उघडले. नंतर त्याने रिलायन्स निप्पॉन कंपनीच्या पॉलिसीची सरेंडर प्रक्रिया पूर्ण करून १९ लाख ३८ हजार ८०५ रुपये त्या खात्यातून वर्ग करून त्या पैशांचा अपहार केला. हा सर्व प्रकार दि. ६ जून ते दि. २२ डिसेंबर २०२३ दरम्यान घडला. हा सर्व बनावट प्रकार लक्षात आल्यानंतर रिलायन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अज्ञात इसमाविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या प्रकरणी पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सोळंके करीत आहेत.

बिल्डिंगच्या पार्किंगमधून बुलेटची चोरी

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । बिल्डिंगच्या पार्किंगमधून पार्क केलेली बुलेट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना अंबड परिसरात घडली. याबाबत धर्मेंद्र अलगू विश्वकर्मा (वय ४८, रा. अद्वैत प्लाझा, रामकृष्णनगर, अंबड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की दि. ९ जून रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास आपली दोन लाख रुपये किमतीची एमएच १५ जेएल ५३६६ या क्रमांकाची बुलेट बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये हॅण्डल लॉक करून पार्क केली होती. दि. ९ जून रोजी रात्री साडेनऊ ते १० जून रोजी सकाळी सात वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली. पार्किंगमध्ये दुचाकी नसल्याचे पाहून विश्वकर्मा यांनी आजूबाजूच्या परिसरात गाडीचा शोध घेतला; मात्र गाडी न सापडल्याने त्यांनी अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध फिर्याद दिली.

गंगापूर रोडवरील अतिक्रमण विभागाची कारवाई

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । गंगापूर रोडवरील शहीद चौक तसेच परिसरातील टपरीधारकांवर मनपाच्या पश्चिम विभागाच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. यावेळी परिसरातील अनधिकृत टपऱ्या उचलून नेण्यात आल्या आहेत. नाशिक महानगरपालिकेच्या पश्चिम विभागातील अतिक्रमण विभागाकडून सातत्याने अतिक्रमण कारवाई सुरू आहे. रविवार कारंजा, शालिमार, मेनरोड आदी भागात कारवाई करण्यात येत असते. मनपा उपायुक्त नितीन नेर यांच्या आदेशान्वये प्रभारी विभागीय अधिकारी मदन हरिचंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम व पूर्व अतिक्रमण विभागाने संयुक्तिक अतिक्रमण मोहीम राबवून गंगापूर रोडवरील शहीद चौक तसेच परिसरातील टपरीधारकांवर अतिक्रमण कारवाई करण्यात आली.

आमदार खासदार यांनी अंतरवलीत जाऊन जरांगेच्या मागण्या पूर्ण कराव्यात - सकळ मराठा समाज नाशिक

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । देशातील लोकसभेच्या निवडणुका संपल्यानंतर मराठा योद्धा मनोज जरंगे पाटील पुन्हा एकदा अंतरवली सराटी या ठिकाणी मराठा समाजाच्या पुढील मागण्यांसाठी आमरण उपोषणाला बसले असून त्यामध्ये मराठा समाजाचा सरसकट ओबीसी मध्ये समावेश करून आरक्षण देण्यात यावे सगेसोयरे हा जीआर संविधानिक व कायदेशीर पद्धतीने मान्य करून त्याची अंमलबजावणी करावी मराठा समाज बांधवांच्या ज्या ज्या ठिकाणी कुणबी नोंदी सापडले आहेत त्या सर्व समाज बांधवांना कुणबीचे प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे महाराष्ट्रात मराठा आरक्षणासाठी विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांमध्ये मराठा समाजाच्या समाज बांधवांवर जे गुन्हे दाखल झाले आहेत ते तात्काळ मागे घ्यावेत यासाठी पुन्हा एकदा त्यांनी आंदोलन सुरू केले असून या आंदोलनाला महाराष्ट्रातून सगळ्या जिल्ह्यांमधून पाठिंबा मिळत असून सकल मराठा समाज नाशिक जिल्ह्याच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व नवनिर्वाचित खासदार आमदार यांना आव्हान करण्यात येते की आपण सर्वांनी अंतर्वली सराटी या ठिकाणी जाऊन मराठा योद्धा जरांगे पाटील यांना आपल्या लेटर पॅड वर वरील सर्व मागण्या मान्य करण्यासाठी तुम्ही तात्काळ केंद्र सरकार व राज्य सरकारकडे मागणी करून वरील सगळ्या मागण्या सोडवून घेण्यासाठी प्रयत्न करून मराठा समाजाला न्याय द्याल यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा. महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांना मराठा समाजाचे मत निवडणुकीच्या वेळी महत्त्वाची वाटतात किंबहुना ती मत आपल्याकडे यावीत म्हणून प्रत्येक राजकीय पक्ष त्यासाठी प्रयत्न करत तुम्हाला सत्तेत बसविण्यासाठी मराठा समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते आणि तीच या निवडणुकीत बघायला मिळाली त्यामुळे मराठा समाजाने प्रामाणिकपणे आपल्याला सर्व पक्षांना मतदान केलं आहे म्हणून महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील सगळ्यात अनुभवी नेते राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब यांना सकल मराठा समाजाच्या वतीने विनंती करण्यात येते की आपण ज्या पद्धतीने महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांना न्याय देण्यासाठी मोठ्या भावाची भूमिका घेऊन राजकारणात न्याय दिला त्याच पद्धतीने मराठा समाजासाठी आपला दांडगा अनुभव पणास लावून अंतरवली सराटी या ठिकाणी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील ज्या मागण्यांसाठी उपोषण करत आहे त्या ठिकाणी आपण स्वतः नेतृत्व करत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार शिवसेनाप्रमुख उद्धव साहेब ठाकरे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर साहेब रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदासजी आठवले शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी प्रहार संघटनेचे बच्चू कडू याचबरोबर महाराष्ट्रातील सर्व उर्वरित पक्षांच्या नेत्यांना एकत्रित करून मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा यासाठी आपण स्वतः अंतर्वली सराटी या ठिकाणी या सर्वांना घेऊन जावे व मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सुरू असलेले उपोषण स्थगित करून मराठा समाजाला न्याय द्यावा मराठा समाज आपले उपकार आयुष्यभर विसरणार नाही.मराठा समाजाला न्याय देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य तसेच जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी आपण निश्चितपणे पार पाडून गरीब मराठा समाजाला न्याय द्यावा अशी आपल्याकडे आम्ही अपेक्षा व्यक्त करतो. वरील सर्व पक्षाचे नेते मराठा आरक्षणाच्या संदर्भात जाहीर भूमिका घेत नसतील तर आम्हाला सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या घरासमोर आंदोलन करावा लागतील ही वेळ मराठा समाजावर आपण येऊ देऊ नये यासाठी आमच्या मागणीचा तात्काळ आपण विचार करून आंतरवली सराटी येथील आंदोलनातील मागण्या मान्य करून आंदोलन स्थगित करावे. अन्यथा आपल्या विरोधात आपल्या निवासस्थानाच्या बाहेर आंदोलन केले जाईल याची नोंद घ्यावी.पहिले आंदोलन हे बारामती मधून शरदचंद्रजी पवार साहेबांच्या घरापासून सुरू केले जाईल त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या घरासमोर होईल व या आंदोलनातून जे काही परिणाम होतील या सर्वस्वी आपण सर्व नेते असाल हे आपण नोंद घ्यावी.

यावेळी पत्रकार परिषदेसाठी मराठा क्रांती मोर्चाचे करण गायकर,विलास पांगारकर, काका पवार,नवनाथ शिंदे,वैभव दळवी, आण्णा खाडे,सचिन पवार,विलास जाधव, विलास गायधनी,दिनेश नरवडे,ज्ञानेश्वर कोतकर,संदीप फडोळ,दादासाहेब जोगदंड,काका नवले,नारायण बाबा जाधव,नितीन आतकर पाटील,ममता शिंदे, संगीता सूर्यवंशी,सविता वाघ,राहुल काकळीज,शुभम महाले,भारत पिंगळे, बाबुराव कोकणे,दत्तू कोंकणे,रवी धोंगडे, सुनील धोंगडे,वैभव पांगारकर,विलास धोंगडे,संतोष शेलार,मनीषा कोकणे, बाळासाहेब गारुळे,अनिता गारुळे,अजय वानखेडे.

जागतिक फॅटी लिव्हर दिनानिमित्त जागरूकता आणि प्रतिबंधनाची गरज

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । सध्या नागरीकांमध्ये अत्यंत दाट स्वरूपात फॅट वाढण्याचे प्रमाण वाढत असून हे भारतीयांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असल्याचे समोर आले आहेत. जागतिक फॅटी लिव्हर ही सुध्दा एक दिवस मोठी समस्यां बनेल. जर आपण वेळेत आपल्या आरोग्याची तपासणी वा बीएमाई केली नाही तर. फॅट लिव्हर ही पुढील काही वर्षांत घातक बिमारी असणार आहेत वा ती प्रत्येकात असण्याची दाट शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे नाशिक मधील प्रसिद्ध डॉ. हुसेन बोहारी कन्सल्टंट , नाईन पल्स हॉस्पिटल नाशिक यांनी सजगतेचा वा ऍडव्हान्स सल्ला देखील नाशिककरांना दिला आहेत.

फॅटी लिव्हर रोग म्हणजे यकृताच्या पेशींमध्ये अतिरिक्त चरबी साचणे. आणि हा रोग मध्यपानाशिवाय होतो. यामध्ये प्रामुख्याने स्थूलता , मधुमेह , आणि मॅटोबोलीक सिंड्रोमांशी , संबंधित आहेत. याचे प्रामुख्याने प्रसार आणि जोखमीचे घटक जर विचारत घेतले तर अलीकडील अभ्यासानुसार , जागतिक लोकसंख्येच्या सुमारे २५ % लोक फॅटी लिव्हर रोगाने ग्रासित आहेत. स्थूलता आणि स्थिर जीवनशैली वाढल्यामुळे याची प्रसारता वाढत आहेत. यामुळे स्थूलता , मधुमेह , उच्च कोलेस्ट्रॉल , उच्च रक्तदाब, खराब आहार , शारीरिक निष्क्रियता असे लक्षणे व विकार वाढीस लागतात. जागतिक फॅटी लिव्हर दिनानिमित्त, डॉ। हुसेन बोहारी कन्सल्टंट नाईन पल्स हॉस्पिटल नाशिक मध्ये लिव्हर रोगाशी लढण्यासाठी व्यापक काळजी, रुग्ण शिक्षण आणि समुदायाच्या कार्यक्रमांद्वारे आपल्या वचनबद्धतेची पुनरावृत्ती करते. आमच्याकडे आहार सल्ला, फिटनेस कार्यक्रम आणि विशेष यकृत क्लिनिक यांसारख्या विविध सेवा उपलब्ध आहेत, ज्यामुळे आमच्या रुग्णांना फॅटी लिव्हर रोगाचे व्यवस्थापन आणि प्रतिबंध करण्यात मदत होते. नाईन पल्स हॉस्पिटल कडून सर्वांना आवाहन करण्यात येते की सूचित निवडी करून, आपण फॅटी लिव्हर रोगाचा भार कमी करू शकतो आणि एकंदर यकृत आरोग्य सुधारू शकतो. चला, एकत्र येऊन यकृत रोग प्रतिबंधात्मक आणि व्यवस्थापनीय असलेल्या भविष्याकडे वाटचाल करू या. असे डॉ। हुसेन बोहारी यांनी म्हटले आहेत.

सातपुर पोलीस ठाण्यात चाललंय तरी काय ? जीव घेणा हल्ला करून सुद्धा आरोपी मोकाट कसे!

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । सध्या नाशिक मध्ये कौटुंबिक आणि सामाजिक भांडणे वाढण्याचे प्रमाण अधिक वाढल्याने समुळ समस्यांचे निदान होतांना दिसत नसल्याचे चित्र काही का होईना ह्या समाजातल्या घटकांकडून वारंवार ऐकीवात येत आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाचे पितळ उघडे होईल एवढे पोलीस प्रशासनाने आज पर्यंत काही काम केलेले नाहीत मात्र अनवधानाने काही अशा केसेस पोलीस प्रशासनाच्या हाती येऊन सुद्धा मागे राहत असल्यास त्याचा उपयोग नागरीकांना होत नाहीत.

त्यामुळे काही घटकांतील भांडणे हे अधोरेखित करण्यासारखे असल्याने त्यावर वेळीच उपचार करणे गरजेचे असतांना तक्रारदार आणि आरोपी यांची माहिती खरी की खोटी ही शहानिशा वास्तविक समोरासमोर पोलीस ठाण्यात व्हायला हवी. असे असतांना देखील त्याकडे दुर्लक्षच जर होत असेल तर आपली पुष्टी दैनिक लोकमंथन करत नाहीत. सातपुर परिसरात वारंवार अशा घटनांचे वाढते प्रमाण लक्षात घेता साधारण मे महिन्यात सातपुर परिसरात खळबळजनक घटना घडलेली असतांना साधी एफआयआर नोंदवून पुढील प्रकिया निश्चितच निष्क्रिय ठरली असल्याचे तक्रारदार याने बोलवून दाखविल्याने घटनेचे गंभीर स्वरूप लक्षात येते. सातपुर परिसरातील तक्रारदार याने सातपुर पोलीस ठाण्यात योग्य काम होत नसल्याने शहर पोलीस आयुक्तांना निवेदन देऊनही दखल घेतली गेली नसल्याची माहिती दिली आहेत. त्यामुळे सातपुर पोलीस निरीक्षक व सहकर्मचारी काय करतात ! असा सवाल का पडू नये ? पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी यांचे मार्गदर्शनाने तक्रारदार यास योग्य न्याय मिळणे अपेक्षित आहेत.

आदिवासी विकास विभागाची पदभरती तूर्त स्थगित

नाशिक । आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावर २३ नोव्हेंबर २०२३ रोजी आदिवासी विकास विभागातील ६०२ विविध रिक्त पदांकरिता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु शासन निर्देशानुसार काही अपरिहार्य कारणामुळे सदर पदभरती जाहिरात तुर्तास स्थगित करण्यात आली असल्याचे आयुक्त आदिवासी विभाग, नाशिक नयना गुंडे यांनी शासकीय प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे. आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरून या पदभरती जाहिरातीनुसार २३ नोव्हेंबर २०२३ ते १३ डिसेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले होते. विविध पदांकरिता उमेदवारांचे अर्जही ऑनलाईन प्राप्त झाले होते. तथापि २६ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) या संवर्गाचा समावेश करून त्यानुसार बिंदुनामावली अद्ययावत करून गट क संवर्गासाठी जाहिरात पुनश्च प्रसिद्ध करण्याबाबत शासनस्तरावरून सूचित करण्यात आले आहे. सदर जाहिरात तूर्तास स्थगित करण्यात आली असून, याची नोंद उमेदवारांनी घेण्याचे आवाहन पत्रकात करण्यात आले आहे. तसेच, याबाबत आदिवासी विकास विभागातील क्षेत्रीय कार्यालयाकडून पुनश्च बिंदुनामावली अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू असल्यामुळे त्यानंतर याबाबतची पुढील कार्यवाही सविस्तर कळविण्यात येणार असल्याची अर्ज भरलेल्या उमेदवारांनी नोंद घ्यावी, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

प्रदक्षिणा मार्गावर महिला भाविकांची लूट

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी गेलेल्या दोन महिला भाविकांना एका अनोळखी युवकाने अडवून त्यांच्याकडील रोख रक्कम व मोबाइल असलेली पिशवी हिंसाकावून पोबारा केला. त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तिनाथ मंदिर परिसरातील एका मठात आळंदी आणि इगतपुरी तालुक्यातील दोन महिला भाविक दर्शनासाठी आल्या होत्या. सोमवारी (दि. १०) सकाळी सहा वाजता त्यांनी ब्रह्मगिरी प्रदक्षिणा करण्यास सुरुवात केली. गौतम ऋषींचे मंदिर असलेल्या टेकडीवर पोहचल्या असता तेथे अनोळखी तरुणाने महिला दर्शन घेत असल्याचे बघून वृद्ध महिलेच्या हातातील पिशवी हिसकावून - पोबारा केला. घाबरलेल्या महिलांनी गौतम ऋषी डोंगर उतरून वस्तीवर घडलेला प्रकार कथन केला. त्यानंतर त्र्यंबक पोलिस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली पिशवीत दोन मोबाइल आणि १५ हजार रुपये रोख तसेच आधारकार्ड असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: नाशिक

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 11-06-2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. संतोष सूर्यभान वाघ 2. शोभा सूर्यभान वाघ 3. वैशाली संतोष वाघ	मालमत्तेच्या पत्त्याचा सर्व तुकडा आणि पार्सल - दुकान क्रमांक 03, तळमजला, संकल्प शूज शॉप, स्वप्नील अपार्टमेंट, प्लॉट क्र. 02, एस. नं. 860/1/4/2/ ते 6/2, अशोक टॉवर ऑफिसच्या पुढे, साईबाबा मंदिरासमोर, कल्पतरू नगर, अशोका मार्ग, नाशिक, महाराष्ट्र. सीमा: पूर्व - दुकान क्रमांक 4 ची कॉमन वॉल; पश्चिम - दुकान क्रमांक 2 ची कॉमन वॉल; उत्तर - इमारतीचे सामान्य पार्किंग क्षेत्र; दक्षिण - 30.00 मीटर रुंद D.P. रस्ता	NSKHL15 000565	30/5/2024	रु. 4,10,028	रु. 4,219,555.77/-	रु. 41,00,280	सर्व कामकाजाच्या दिवसांत पूर्व भेटीसह	19-07-2024 सकाळी 10:00 पासून ते संध्याकाळी 5:30 पर्यंत.

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **18/07/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **19/07/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **20/07/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की; **नाव-अशोक लबडे, संपर्क क्रमांक 9637764444, ऑफिस एल&टी फायनान्स लिमिटेड - ऑफिस नंबर 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे -411005. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, - ऑफिस : 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 13.06.2024
ठिकाण: नाशिक

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक** अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथून छापून शॉप नं. २, तिसरा मजला, बळवंत प्लाझा, वकील वाडी, हॉटेल पंचवटीच्यासमोर, नाशिक - १, पिन - ४२२००१ येथे प्रकाशित केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक** - रंजन साळवी. फोन नं. (०२५३) २३१०६०० RNI : MAHMAR/2011/41224. EMAIL : lokmanthan.nashik2498@gmail.com (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.)